जलसंपदा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे
गोपनीय अहवाल लिहिणेबाबत-सन २०१५-१६

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः गोपअ-२०१६/(प्र. ३ /२०१६)/गो.का.

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीखः २० जानेवारी, २०१६

वाचा :

१) **शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १ नोव्हेंबर,२०११.**
२) **शासन निर्णय क्रमांकः सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२११/प्र.क्र.२१७/तेरा, दिनांक १७ डिसेंबर, २०११.**
३) **शासन परिपत्रक क्रमांकः जलसंपदा विभाग, क्र.संकीर्ण-२०१२/(३/१२)/गो.का.दिनांक ९ एप्रिल, २०१२**
४) **शासन परिपत्रक क्रमांकः जलसंपदा विभाग, क्र.संकीर्ण-२०१२/(३/१२)/गो.का. दिनांक ९ मे, २०१२**
५) **शासन परिपत्रक क्रमांकः जलसंपदा विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/(३७/१३)/गो.का. दि. २२ जुलै, २०१३**
६) **शासन परिपत्रक क्रमांकः जलसंपदा विभाग, क्र.गोपअ-२०१५/(प्र.१/१४)/गो.का.दि. १५ फेब्रुवारी, २०१५**
७) **शासन परिपत्रक क्रमांक: सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.५६६/का-१२, दिनांक ८ जानेवारी, २०१६.**

शासन परिपत्रक :

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे व जतन करणे याबाबत संदर्भ क्र.१ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१/११/२०११ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १७ डिसेंबर, २०११ अनुसार गोपनीय अहवाल वेळेत प्रतिवेदित व पुनर्विलोकित करण्यासाठी दरवर्षी प्रतिवेदन व पुनर्विलोकन कॅम्पचे आयोजन करण्यासंदर्भात सूचना निर्गमित केल्या आहेत. या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ व ४ येथील या विभागाच्या अनुक्रमे दि.९/४/२०१२ व ९/५/२०१२ च्या परिपत्रकान्वये संस्करण अधिकारी घोषित केलेले आहेत. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.५ येथील या विभागाच्या दिनांक २२/७/२०१३ च्या परिपत्रकान्वये प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास) आणि प्रधान सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि) ज्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन व पुनर्विलोकन करतील अशा अधिकाऱ्यांची यादी प्रसारित केलेली आहे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.६ येथील दिनांक १५/२/२०१५ च्या परिपत्रकान्वये गोपनीय अहवाल लिहिणे आणि प्रतिवेदन/पुनर्विलोकनाबाबत मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत.

वरील शासन निर्णय व शासन परिपत्रकांतील तरतुदी विचारात घेऊन जलसंपदा विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल विहित कालावधीत लिहिले जातील या अनुषंगाने पुनःश्च पुढील सूचना देण्यात येत आहेत.

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.सीएफआर-१२१०/प्र.क्र.४७/२०१०/तेरा, दिनांक १ नोव्हेंबर, २०११ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेला गोपनीय अहवालाचा नमुनाच वापरण्यात

यावा. गोपनीय अहवालाची प्रत अन्य कोणत्याही प्रकारे बाहेरुन टंकलिखित करुन अथवा छपाई करुन न घेता, शासकीय मुद्रणालयातूनच उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या प्रतीचा वापर करावा. सामान्य प्रशासन विभागाच्या दि.८/१/२०१६ च्या परिपत्रकान्वये पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होण्याच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी गोपनीय अहवाल उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे. ही बाब लक्षात घेता, सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १/११/२०११ च्या शासन निर्णयासोबतच्या सहपत्र २ मध्ये विहित केलेल्या वेळापत्रकानुसार गोपनीय अहवाल प्रतिवेदित व पुनर्विलोकीत करण्याची कार्यवाही केली जाईल याची सर्व कार्यालय प्रमुखांनी दक्षता घ्यावी.

२) गोपनीय अहवालाच्या विहित नमुन्यानुसार गोपनीय अहवालामध्ये स्थळ व दिनांक नमूद करणे आवश्यक आहे. स्थळ व दिनांक नमूद असल्याखेरीज कोणताही गोपनीय अहवाल संस्करण अधिकाऱ्यांनी स्विकारु नये अथवा सदर त्रुटींची पूर्तता विहित कालावधीत पूर्ण करुन घेण्याची दक्षता घ्यावी.

३) या विभागाच्या दिनांक २२/७/२०१३ च्या परिपत्रकान्वये प्रधान सचिव (ज.सं.प्र.व विकास) आणि प्रधान सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि) हे ज्या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदन व पुनर्विलोकन करतील अशा अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदनासाठी दिनांक १५ एप्रिल, २०१६ पूर्वी तसेच पुनर्विलोकनासाठी दिनांक ३० एप्रिल,२०१६ पूर्वी सादर करावेत.

४) अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल लिहितांना न्यायालयीन प्रकरणांचा विहित वेळेत निपटारा, न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही, न्यायालयीन प्रकरणी विहित कालावधीत दाखल केलेली अपिले, त्याचप्रमाणे अनुसूचित जाती/जमाती आयोग, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग यासारख्या विविध सांविधानिक प्राधिकरणांना देण्यात आलेला प्रतिसाद या बाबी विचारात घेऊन मूल्यमापन करण्यात यावे.

५) गोपनीय अहवालासंदर्भातील कार्यवाही पूर्ण करण्याच्या दृष्टीने कॅम्पचे आयोजन करण्याची जबाबदारी स्तरनिहाय विभागीय आयुक्त/प्रादेशिक विभाग प्रमुख/जिल्हाधिकारी यांची असल्याने त्यांच्याशी संपर्क साधून आपल्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत /पुनर्विलोकीत करुन घेण्याच्या दृष्टीने कॅम्पचे आयोजन करण्यासंदर्भात कार्यवाही करावी.

६) सर्व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिनस्त अधिकारी/कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालासंदर्भातील स्वयंमूल्यांकन भरलेले गोपनीय अहवाल सदर कॅम्पच्या दिवसापूर्वी संबंधीत प्रतिवेदन अधिकाऱ्यांकडे पोहचविले जातील याची व्यवस्था करावी.

७) आपल्या अधिपत्याखालील कार्यालयातील प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारी यांची यादी व ते ज्या अधिकारी/ कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल प्रतिवेदीत/पुनर्विलोकीत करणार आहेत अशा अधिकारी/कर्मचारी यांची प्रतिवेदन/पुनर्विलोकन अधिकारीनिहाय संख्या स्तरनिहाय कॅम्प आयोजित करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांना (विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी) कळवावी.

८) कॅम्पचे ठिकाण, वेळ व कॅम्पला उपस्थित राहणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सोयीस्कर मार्ग, वाहतुकीची साधने इत्यादीचा सविस्तर कार्यक्रम तयार करुन कॅम्प आयोजनापूर्वी लवकरात लवकर सर्व संबंधित अधिकाऱ्यांना कळवावे.

९) **मे महिन्याचा दुसरा शनिवार व लगतच्या रविवारी प्रतिवेदनासाठी** कॅम्पचे आयोजन करावे. **तसेच चौथा शनिवार व लगतच्या रविवारी पुनर्विलोकन** कॅम्पचे आयोजन करावे. या प्रतिवेदन/पुनर्विलोकन कॅम्पमध्ये क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे १०० टक्के गोपनीय अहवाल कॅम्पच्या दिवशी किंवा तत्पूर्वी लिहून घेतले जातील अशा सक्त सूचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व अधिकाऱ्यांना देण्यात याव्यात.

१०) गोपनीय अहवाल विहित मुदतीच्या आत प्रतिवेदीत किंवा पुनर्विलोकीत न करणाऱ्या अधिकाऱ्यांची १ जुलै रोजी देय होणारी वार्षिक वेतनवाढ तसेच निवृत्ती वेतनार्थ लाभ रोखून ठेवण्याच्या सूचना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकीर्ण-१०१३/प्र.क्र.५५/कोषा प्र-५, दिनांक १२ सप्टेंबर,२०१३ अन्वये दिलेल्या आहेत. त्यानुसार विहित कालमर्यादेतच गोपनीय अहवाल प्रतिवेदित/पुनर्विलोकीत केले जातील याची दक्षता घेण्यात यावी.

११) आपल्या अधिपत्याखालील कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सन २०१५-१६ या वर्षातील प्रलंबित गोपनीय अहवालासंदर्भातील माहिती सोबतच्या **"विवरणपत्र-इ"** मध्ये भरुन, ती कोणत्याही परिस्थितीत **दिनांक १५ जून, २०१६** पर्यंत शासनास सादर करावी.

१२) आपल्या कार्यकक्षेतील उप अभियंता स्तरावरील अधिकाऱ्यांचे सन २०१५-१६ च्या गोपनीय अहवालाच्या मूळ प्रती तसेच कार्यकारी अभियंता आणि त्यावरील अधिकाऱ्यांच्या सन २०१५-१६ च्या गोपनीय अहवालाच्या मूळ व दुय्यम प्रती संस्करणाची कार्यवाही पूर्ण करुन शासनाकडे जतन करण्यासाठी पाठविण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१६०१२११२०७०३०४२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Karbhari Chaudhari

Digitally signed by Vijay Karbhari Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vijay Karbhari Chaudhari
Date: 2016.01.21 12:08:12 +05'30'

(विजय चौधरी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) सर्व कार्यकारी संचालक/महासंचालक, जलसंपदा विभाग.
२) सर्व सह सचिव/ उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय.
३) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव,/ अधीक्षक अभियंता व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय
४) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग
५) मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे,
६) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
७) प्रधान सचिव (जलसंधारण), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव, नियोजन विभाग (रोहयो), मंत्रालय, मुंबई,
९) सर्व महसूल विभागीय आयुक्त,
१०) सर्व जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
११) सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, जलसंपदा विभाग, मंत्रालय,
१२) सामान्य प्रशासन विभाग (तेरा), मंत्रालय, मुंबई.
१३) गोपनीय कार्यासन (संग्रहार्थ)

शासन परिपत्रक क्रमांक : गोपअ-२०१६/(प्र. ३/२०१६)/गो.का.,दिनांक २० जानेवारी, २०१६ सोबतचे सहपत्र.

विवरणपत्र- इ

विभागाचे नांव : जलसंपदा विभाग

विषय : जलसंपदा विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांचे वार्षिक गोपनीय अहवाल व त्यावरील प्रतिवेदने

अ) अधिकारी/कर्मचारी यांच्या सन २०१५-१६ या वर्षाचे प्रलंबित वार्षिक गोपनीय अहवाल व त्यावरील प्रतिवेदनांचा तपशील.

संवर्ग	विभागातील व विभागांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांची संख्या	त्यापैकी गोपनीय अहवाल नस्त्या अद्ययावत असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या	गोपनीय अहवालामध्ये प्रलंबित असलेल्या प्रतिवेदनांची संख्या
गट-अ			
गट-ब			
गट-क			

ब) विभागांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल ज्यांच्याकडे प्रलंबित आहेत अशा अधिकाऱ्यांचा तपशील.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव व पदनाम	त्यांच्याकडे पलंबित असलेल्या गोपनीय अहवालांची संख्या		केव्हापासून प्रलंबित आहेत.
१.		गट-अ		
		गट-ब		
		गट-क		
२.		गट-अ		
		गट-ब		
		गट-क		